।। सबका मालिक आत्मा ।।



# आत्मा (SOUL)

।। हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ।।

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।। ॐ गुरुदेव ।।

# आत्मा मालिक

मे-२०२६

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २५ वे अंक ५ वा मे २०२६ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय -
साधनांची पराकाष्ठा : ध्यान - संत परमानंद महाराज ... ४

आत्मा, आत्मज्ञान व आत्मानुभव -डॉ. विजय बाणकर ... ६

नामदेवांचे अभंग-आत्मचरित्र - भाग ७ - नामदेव सदावर्ते ... ११

आनंद हा जन्मसिद्ध हक्क -बंडोपंत कुलकर्णी ... १७

ऐसी कर्मगती : ऐसा ध्यानी ज्ञानिया : भाग ५ - डॉ. सुनील शिंदे ... २१

आत्मा जाणावा अंतरी -बी. के. गायकवाड ... २३

विछोह - नरेश यादव ... २७

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## साधनांची पराकाष्ठा : ध्यान

**संपादकीय**

**समाधी ही ध्यानाच्या सर्व साधनांची पराकाष्ठा आहे, चरमसीमा आहे. समाधीसाठी शांत डोके, स्पष्ट ध्येय, आळसरहीतपणा, सहजता, साधेपणा आणि सत्यता असावी लागते. समाधी अवस्था तेव्हा प्राप्त होते, जेव्हा त्याचे ध्यान एकचित्तपणे अंतरंगात स्थिर असते. साधक सर्व साधनेच्या सर्व अवस्था, टप्पे पार करून जातो, तेव्हाच समाधी लागते. साधक ध्यान करीत करीत अशा अवस्थेप्रत जातो, जेथे त्याला स्वतःचे भान राहत नाही.**

**-संत परमानंद महाराज**

वास्तविक समाधी म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर एखाद्याचे मृत शरीर पुरण्याची क्रिया येते. काही साधूपुरुष संजीवन समाधी घेतात. मात्र, ही केवळ देहातून मुक्ती असते. वास्तविक समाधीचा भावार्थ वेगळा आहे.

**देहाभिमाने गलिते विज्ञते परमात्मन।**
**यत्र यत्र मनो याति तत्र तत्र समाधयः।।**

अर्थात जेव्हा साधकाला शरीराचेही भान राहत नाही, परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होते, अशा अवस्थेत मन जेथे जेथे जाईल, ती ती समाधी अवस्थाच म्हणावी लागेल. समाधी कुठून बाहेरून शरीरात येणार नाही. समाधी ही आपल्या आतील एक अवस्था आहे. समाधी या अवस्थेलाच मोक्ष किंवा निर्वाण असेही म्हटले जाते. बौद्ध धर्मात याला निर्वाण आणि जैन धर्मात याला कैवल्य म्हटले जाते. योगशास्त्रात याला समाधी असे म्हटले जाते. मोक्षाच्या अवस्थेत मन निष्क्रिय होऊन जाते. समाधी ही ध्यानाच्या सर्व साधनांची पराकाष्ठा आहे, चरमसीमा आहे. समाधीसाठी शांत डोके, स्पष्ट ध्येय, आळसरहितपणा, सहजता, साधेपणा आणि सत्यता असावी लागते. समाधी अवस्था तेव्हा प्राप्त होते, जेव्हा त्याचे ध्यान एकचित्तपणे अंतरंगात स्थिर असते. साधक सर्व साधनेच्या सर्व अवस्था, टप्पे पार करून जातो, तेव्हाच समाधी लागते. साधक ध्यान करीत करीत अशा अवस्थेप्रत जातो, जेथे त्याला स्वतःचे भान राहत नाही. मात्र, ध्येय त्याच्या डोळ्यासमोर अढळ असते. अशा वेळी ज्ञेय, ज्ञान आणि ज्ञाता यांतील अंतर संपुष्टात येते. साधक अणु-परमाणूंच्या संरचनेपार जाऊन केवळ मुक्त, साक्षी आत्मा शिल्लक राहतो. अशा अवस्थेत साधक परमस्थिर आणि परमजागृत होतो.

एखादा मीठाचा खडा समुद्रात टाकला तर समुद्राच्या तळाशी जाता जाता तो त्या पाण्यातच एकरूप होतो, विरघळून जातो. आपले अस्तित्व हरवून बसतो. तद्वतच साधकही समाधीअवस्थेत परमात्म्यामध्ये एकरूप होऊन जातो. जे साधक आपल्या इंद्रियांचा बाह्य प्रवाह रोखू शकतात, भौतिक वस्तूंचा मोह त्यागतात, मनातून अहंकार काढून टाकतात आणि आत्म्यात लीन होऊन समाधीप्रत जातात, ते या जगातील सर्व बंधनांतून मुक्त होऊन मोक्ष प्राप्त करतात. परंतु, जे केवळ अध्यात्मिक गोष्टी करतात, पण प्रत्यक्ष ध्यान, समाधीचा अभ्यास करीत नाहीत, ते जगातील भौतिक बंधनांपासून

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

कधीच मुक्त होऊ शकत नाहीत.

समाधीअवस्थेप्रत पोहचलेला साधक रस, गंध, स्पर्श, शब्द, अंधःकार, प्रकाश, जन्म मरण, रूप आदींच्या पलिकडे पोहचलेला असतो. याशिवाय तो ऊन, वारा, थंडी, भूक, तहान, यश-अपयश, सुख-दुख याच्याही पलीकडे जातो. अशा वेळी समाधीत ना ध्याता उरतो, ना ध्यान. मनाची चेतना संपुष्टात येते आणि मन ध्यानरूपच होऊन जाते. समाधीत शारीरिक आणि मानसिक दोन्ही चेतनांचा अभाव असतो. साधकाच्या वास्तविक स्वरुपाचा केवळ अस्तित्वच शिल्लक राहते. अशा अवस्थेला तुरिया अवस्था म्हणतात, जी परमचेतना अथवा अनिर्वचनीय अवस्था आहे. कधी कधी साधकाला अर्धनिद्रेच्या अवस्थेत असा अनुभव येऊ शकतो. जेव्हा साधकाचा मेंदू जागृत असतो, पण शरीर झोपलेले असते. यातून साधकाला झोपेपेक्षा अधिक स्फुर्ती आणि आराम झाल्याचा अनुभव येतो. परंतु, अशी अवस्था दीर्घसाधनेतूनच शक्य आहे. काहींचे असे म्हणणे आहे की, समाधी ही दगडासारखी जड अवस्था आहे. तथापि, साधकाचे ब्रह्मांडीय जीवन याच अवस्थेपासून सुरू होते. साधकाची कुंडलिनी नाभिचक्रातून जागृत होऊन सुषुम्नेच्या माध्यमातून मस्तिष्कापर्यंत पोहचते. यामुळे सर्व चक्रे जागृत होतात.

आनंदमय कोषात प्रवेश करणे यालाही समाधीची अवस्थाच म्हटले जाते. समाधी वेगवेगळ्या प्रकारची असते. काष्ठ समाधी, ध्यान समाधी, भाव समाधी, सहज समाधी, प्राण समाधी आदि. नशा किंवा क्लोरोफॉर्म घेतल्यानंतर जी बेशुद्धावस्था येते तिला काष्ठसमाधी म्हणतात. एखाद्या भावनेच्या अधीन जाऊन शरीर स्थिर होणे याला भावसमाधी म्हणतात. इष्टदेवतेच्या ध्यानात साधक इतका बुडून जातो की त्याला निराकार, अद्भुत, अदृश्य शक्ती दिसू लागतात. डोळे बंद असतानाही प्रतिमा स्पष्ट दिसू लागतात. अशा अवस्थेला ध्यानसमाधी म्हणतात. ब्रह्मरंध्रात प्राण एकत्र करणे याला प्राणसमाधी म्हणतात. साधक स्वतःला ब्रह्मात लीन झाल्याचा अनुभव करतो, त्याला ब्रह्मसमाधी म्हणतात. मात्र, सर्व समाधींमध्ये सर्वात साधी, सोपी सहज समाधी असते. सहजसमाधीचे वैशिष्ट्य म्हणजे साधक संसारात राहूनही साधनेचा अभ्यास करू शकतो. साधकाच्या जीवनातील अहंभाव जवळपास संपूनच जातो. तो या जगातील प्रत्येक कार्य प्रभुइच्छा म्हणूनच करतो.

अशा प्रकारे साधनेच्या अनेक टप्प्यांतून जाऊन साधक समाधीअवस्थेला पोहचू शकतो. मात्र, त्यासाठी ध्यान करणे ही प्राथमिक गरज आहे. परमतत्त्वाला प्राप्त करण्यासाठी, समाधी अवस्थेप्रत जाण्यासाठी ध्यान करा, ध्यानी बना!

**||आत्मा मालिक||**

**-संत परमानंद महाराज,**

संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आत्मा, आत्मज्ञान व आत्मानुभव

आत्मज्ञानप्राप्तीच्या किंवा आत्मानुभवाच्या वाटेवरील काही खुणा वा टप्प्यांचे संक्षिप्त वर्णन करून आत्म्याचे म्हणजे आपले व विश्वाचे मूळ म्हणजे अंतिम सत्यस्वरूप 'अनुभवप्रकाश' या ग्रंथात वेगवेगळी नावे, संज्ञा व बाह्य गोष्टींचे संदर्भ देऊन समजावून दिले आहे. त्यातील काही प्रमुख बाबी या लेखात उद्धृत केल्या आहेत, संतवचनांचे आधारही काहींपुढे कंसात दिले आहेत

**- डॉ. विजय बाणकर**

**१. जहाज :**

सर्व दृश्यस्वरूपात आपले गुरुस्वरूपच महान असून पूज्य आहे हा प्रत्येक चैतन्य आत्माच लौकिक गुरुमूर्ती धारण करून मुमुक्षुंचा उद्धार करतो. संसारउद्धरणाचे तेच एक जहाज आहे.

**२. काकभुशुंड :**

काकभुशुंड ऋषी श्रीवसिष्ठ मुनींना सांगतात, ''कोट्यानुकोटी ब्रह्मांडांची उत्पत्ती, स्थिती आणि लय, त्यातील साम्य व विलक्षणता मी पाहिली आहे. अनेक ब्रह्मा, विष्णू व शिव तसेच रामकृष्णादिक अवतारही पाहिले, ते सर्व जाणारे येणारे होते; सत्य नव्हते. आत्माच एक सत्य आहे.'' ((१)संत श्रीकबीर यांनीही आपल्या आत्मस्वरूपाचा बोध करून देताना ''आय ॲम ऑल्वेज् अँड विल रिमेन फॉर एव्हर. अ मिलियन ऑफ विष्णुज् हॅव्ह पास्ड, मेनी मिलियन कन्हैयाज्. काउंटलेस मिलियन शंभुज् हॅव्ह बिन, मोहम्मद अँड हिज् खलीफ्स; गॉड्स दॅट कॅनॉट बि नम्बर्ड,.... हिअर, ओ गोरख, सच इज् माय एज्'', असे विधान केलेले आहे. - पृष्ठ क्र. १९, दि बीजक ऑफ कबीर. (२) 'राम हा कालचा सूत दशरथाचा । अनंत काळाचा आत्माराम ।।', असे संत श्रीतुकारामांनीही म्हटले आहे.)

**३. काळ :**

ज्यावेळी तू कर्मांपासून निष्कर्म व सर्व आशांपासून निराश होऊन आत्मविचाराला ठीक रीतीने सामोरा जाशील त्यावेळी देवतांना शोक होईल. कारण देहअभिमानी हेच देवतांचे पशू आहेत. देहाभिमानरहित सम्यक् विद्वान पुरुष देवतांचा गुरू म्हणजेच आत्मा असतो की ज्यापुढे काळदेखील चळचळा कापतो, आत्मा हा काळाचाही काळ आहे. ('अहमेवाक्षयः कालो' व 'अपार जो काळु तो मी', असे अनुक्रमे श्रीकृष्णपरमात्म्याने व संत श्रीज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. - गीता-ज्ञानेश्वरी, १०.३३.२७३)

**४. भूमा :**

अन्नमयादिक पंचकोशरूप देह हे तुझे स्वरूप नाही, ते पृथ्वी वगैरे पंचभूतांचे विकाररूप आहे. तू चैतन्यमात्र निर्विकार आहेस; कारण, जन्मनाशादि विकारांचा तू साक्षी आहेस, सर्व दृश्यांची प्रतिष्ठा असा तू 'भूमा'मात्र सुखरूप आहेस. ('यो वै भूमा तत्सुखम्, नाल्पे सुखं अस्ति ....', असे

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

छांदोग्योपनिषदात म्हटले आहे.)

**५. प्रणवातीत :**

सर्व जगत् प्रणवरूप आहे. अकार, उकार, मकार हे क्रमाने स्थूल, सूक्ष्म, कारण प्रपंचरूप आहेत. जोपर्यंत तू त्रिगुणरूप प्रणवाचा त्याग करीत नाहीस तोपर्यंत सुखप्राप्ती होणार नाही; कारण, आत्मा प्रणवाच्या पलीकडे आहे. ('प्रणवाचा माथा बुडे । येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे ।.....ऐसी ब्रह्मींची स्थिती ।..', हा योगसाधनेतील सर्वोच्च टप्पा ज्ञानेश्वरीत उल्लेखिला आहे. पहा : ६.४६९-४७०)

**६. स्वरूपप्राप्ती :**

ज्यावेळी जाणणे व न जाणणे हे तुझे स्वरूपाचे ठिकाणी राहणार नाही त्यावेळीच तुला स्वरूपाची प्राप्ती होईल. (जाणीव नेणीव भगवंतीं नाही ।', असे 'हरिपाठात' संत श्रीज्ञानदेवांनीही म्हटले आहे.)

**७. आत्मा :**

अवशेष आत्मा इंद्रियद्वारा बाहेरचे कौतुक पाहणारा आहे. तो अवशेष आत्मा इंद्रियांवाचून सोऽहंध्वनी आदि कौतुक पाहणारा म्हणजे अनुभव करणारा आहे. ('डोळ्यांचा डोळा' व 'कानांचा कान', या आत्मानुभवासाठीची वाटचाल सूचित करणाऱ्या शब्दांतून आत्म्याचा निर्देश संतांनी अनेक अभंगातून केला आहे. उदा. 'देखवी ऐकवी तो एक (आत्मा)नारायण'च होय, असे संत श्रीतुकारामांनी म्हटले आहे.

**८. गणेश व मूषक :**

चक्षू मनादि इंद्रियरूप गणांचा स्वामी सच्चिदानंद आत्मारूप गणेश तत्त्वमस्यादि महावाक्यांपासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मात्म अखंडाकार वृत्तीरूप मूषकावर आरूढ होऊन माया तत्कार्यरूप दृश्याचा अत्यंताभाव या निश्चयरूपाने त्यास छेदतो. ('सुक्ष्मातिसूक्ष्म वस्तूतही गणपतीचे अधिष्ठान आहे म्हणूनच त्याला मूषकवाहन म्हणतात, असे संत श्रीएकनाथांनी भागवतारंभीं म्हटले आहे.)

**९. पुष्कर :**

मनुष्यशरीर या पुष्कर तीर्थात मनमुमुक्षुरूप जीव जो ब्रह्मा त्याने चक्षु आदि इंद्रियरूप देवतांसह विष्णुरूप आत्मानात्म्याचा यथार्थ विवेकरूप यज्ञ केला. ('जे तारते ते तीर्थ व ज्याच्यायोगाने तरून जाता येते तेही तीर्थ होय', असा तीर्थ या शब्दाचा अर्थ आहे. मनुष्य देह या अर्थाने 'तीर्थरूप' होय व सद्‌गुरू वा संतमहात्मे हे सर्वोत्तम तीर्थे होत. निजमोक्षप्राप्तीसाठी स्वर्गीय देवही आल्याला मनुष्यदेह प्राप्त व्हावा, अशी इच्छा करीत असतात, असे संत श्रीएकनाथांनी आपल्या 'भागवतात' म्हटले आहे. पहा : ९.२४९ ते ३७४)

**१०. रामेश्वर :**

मुमुक्षुने आपल्या शरीरात त्वंपदवाच्यार्थ जो जीव त्याला राम म्हणावे आणि तत्पदाच्या लक्ष्यार्थास कूटस्थमनसाक्षी ईश्वर जाणावे. हेच जीवाचे रामेश्वर स्वरूप आहे. ('तत् त्वं असि', हे वेदाचे आत्मज्ञान वा आत्मानुभव करून घेण्यासाठीचे मार्गदर्शक महावाक्य आहे.)

**११. हरिद्वार :**

ब्रह्म-आत्मा-एकत्व-ज्ञानद्वाराच सच्चिदानंद निजस्वरूप हरिला प्राप्त होतो. यासाठी ज्ञानाचे नाव हरिद्वार

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आहे. (आत्मज्ञानासारखे पवित्र दुसरे काही नाही, असे गीतेत श्रीहरीनेच म्हटले आहे. पहा : ४.३८)

**१२. अयन :**

बंधरूपी दक्षिणायन आणि मोक्षरूपी उत्तरायन चैतन्य सूर्यानेच जाणले जातात. अंतरातील बंधमोक्षांना बाहेरचे हजारो सूर्यदेखील प्रकाशित करू शकत नाहीत. (दक्षिणायण व उत्तरायनाचे हे पारमार्थिक म्हणजे खरे स्वरूप वेदाला मान्य असल्याचे संत श्रीबहिणाबाईंनी आपल्या मुलाला उपदेशिले आहे. त्या म्हणतात, ''प्रपंचीं विन्मुख जालीयाने चित्त । उत्तरायण सत्य तेंचि आम्हां ।।१।। नाही काज तया उत्तरायणाचे । सांगितले साचे पुत्रराया ।।२।। प्रपंचाभिमुख मानस सर्वदा । दक्षिण प्रसिद्धा जाण तेची ।।३।। बहिणी म्हणे वेदशास्त्राचे संमत । सांगितले मत स्वानुभवें ।।४।।'')

**१३. भागीरथी :**

अष्टांगयोग, आत्मानात्मविवेक व यत्नरूप तपस्येच्याद्वारा अंतःकरणरूप हिमालयातून ब्रह्माकार वृत्तीरूप, ज्ञानस्वरूप गंगा उत्पन्न होते. उपरती व वैराग्य ज्ञानरूपी गंगेला ज्यावेळी मिळतात त्यावेळी जीवन्मुक्तीरूप त्रिवेणी होते. ('जोगी'नामक अभंगात संत बहिणाबाई म्हणतात, '(आत्म)ज्ञान भागीरथीनीर । निर्मळ वाहे स्थिर स्थिर ।।')

**१४. बद्रीकेदार :**

हे मनुष्य शरीर अथवा अंतःकरणरूप उत्तरखंडात अस्तित्व, स्फुरणत्व, प्रियत्वरूप सुखदुःखादि मनसहित मनाच्या धर्मांचा जो अनुभवकर्ता (आत्मा) आहे तोच केदारनाथ व बद्रीनाथ आहे. (अशा बाहेरील कथांचा अर्थ अध्यात्मात लावून घ्यावा, अशी सूचनाही लेखकाने सदर पुस्तकात केलेली आहे.)*

**१५. कल्पतरु व कामधेनू :**

कल्पतरु वा कामधेनू म्हणजे शुद्ध मन. शुद्ध मनात जी इच्छा होते तीच सिद्ध योग्याप्रमाणे पूर्ण होते किंवा सम्यक् आपल्या स्वरूपाचा अपरोक्ष बोध हाच कल्पतरु व कामधेनू होय. ('सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।१।।', असे संत श्रीतुकारामांनीही तदर्थक विधान केले आहे.)

**१६. काशीविश्वेश्वर :**

कायारूप काशीचा प्रकाशक हा बंधमोक्षरहित आत्मा विश्वेश्वर होय. (कायाकाशीपुर नगरीं । आत्माशिव राज्य करी ।।, असे संत बहिणाबाईंनीही 'जोगी' नामक अभंगात म्हटले आहे. 'मनचि मथुरा, मन द्वारिका; काया काशी जाण । देह-मंदिरीं दशवे द्वारीं पहा आत्मज्योत छान ।।', असे संत श्रीकबिरांनीही उपदेशिले आहे.)

**१७. रासक्रीडा :**

देहक्षेत्ररूप द्वारकेचा प्रकाशक तू साक्षी चैतन्य क्षेत्रज्ञरूप कृष्ण आहेस. गोकुळ, मथुरा, वृंदावन आणि द्वारका हे जागृत, स्वप्न, सुषुप्ती व तुरीय ही तुझी क्रीडास्थाने आहेत. तुरीयरूप वृंदावनात 'सर्वमिदमहंच वासुदेव' या प्रकारे सर्व वृत्तीरूप गोपी आपापल्या सांसारिक शब्दादिक विषयरूप पतींना तसेच विषयजन्य सुखरूप पुत्रांचा त्याग करून तू जो क्षेत्रज्ञरूप कृष्ण त्याच्याच आश्रयाने राहतात. थोडक्यात, तू (आत्मारूप) क्षेत्रज्ञ कृष्ण त्या वृत्तीरूप गोपींना प्रकाशित करतो हीच रासक्रीडा आहे.

(गीता-ज्ञानेश्वरीच्या १३व्या अध्यायात 'क्षेत्र-क्षेत्रज्ञ-योग' वर्णिला आहे. आणि श्रीकृष्णकृत रासक्रीडेचा आध्यात्मिक अर्थ संत श्रीबहिणाबाईंनीही एका अभंगात स्पष्ट केला आहे. तो असा : 'अष्टधा प्रकृति त्याचि या गोपिका । अष्टभाव देखा गोपाळ हे ।।१।। क्रीडतो गोकुळीं सदा या शरीरीं । स्वानंद निर्भरीं परमानंदें ।।२।। इंद्रियगोधने विषय तृणचरे । दुभती अपारे निजसत्त्वें ।।३।। ..... बहिणी म्हणे जेथे कृष्णाचा अवतार । तेथे व्यभिचार स्वप्नीं नाही ।।६।।')

**१८. द्वादशलिंगे :**

त्या सत् चित् सुखरूप वस्तुचे नाव महादेव आहे. तो आपल्या मायोपाधीने असत् जडदुःखरूपात्मक हा संसार हेच लिंग उत्पन्न करतो व मायारूप पार्वतीची योनी म्हणजेच कारण येथे स्थापन करतो. मुमुक्षुरूप देवतांकडून प्रार्थ्य जो विष्णुरूप गुरू त्याने पूर्वोक्त जगत्‌रूप लिंगाचे द्वादश भाग विचाररूप चक्राने केले अथवा पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, एक अंतःकरण व एक माया मिळून द्वादश अध्यात्म आहेत.

**१९. द्रौपदी :**

संसाररूप सभेत मायारूप द्रौपदीला (शरीराला) दुःशासन, दुर्योधनादि अनेक वादीरूप सत्ता आपल्या अनेक युक्तीरूप हातांनी निर्णयरूप नग्न करू लागले. परंतु ते निर्णयरूप नग्न झाले नाही; कारण, भक्तिमान परमात्मारूप कृष्णाची तिला सहाय्यता असते.

**२०. राम-रावण :**

रजोगुणरूप रावण विवेकरूप रामाची ब्रह्मविद्यारूप सीता हरण करतो. हा राम अमानित्वादि तसेच अतिकृपालुतादि दैवी गुणरूप वानरांच्या सेनेसह विचाररूप सेतू बांधून अंतःकरणरूप लंकेला जाऊन सत्त्वगुणरूप बिभीषणाचे सहाय्य घेऊन तमोगुणरूपी कुंभकर्णासहित दंभादि आसुरी सेना व रजोगुण अविवेकरूप रावणास मारतो. (अशाप्रकारे श्रीरामांच्या अनेक लीलांचा आता आपण घ्यावयाचा आध्यात्मिक अर्थ 'श्रीहंसराजस्वामी यांनी 'वेदेश्वरी' या ग्रंथाच्या अध्याय ७मध्ये सांगितला आहे.)

**२१. शेषनाग :**

नाग म्हणजे समष्टी, व्यष्टी, माया व तत्कार्य यांचे नांव आहे. त्यांचा 'नेति नेति' या श्रुतीने निषेध करण्याने जो सच्चिदानंद शेष राहतो त्यांचे नांव शेषनाग आहे. माया व तत्कार्य जगत्‌रूप नागाचा हा निजात्मरूप शेषच आधार आहे. (जे ज्याचे स्वरूप असते तेच त्याचा आधार असतो. 'आधारनिलयः' म्हणजे आधारांचाही आधार हे श्रीविष्णुचे एक नाम आहे. शेषावर पृथ्वी तरली आहे, या समजुतीचा अर्थ इथे समजून येतो. 'तुका म्हणे शेष घेईन आवडीं' हा श्रीतुकारामांचा अभंगही आत्मरती-सूचक आहे.)

**२२. वामन :**

निश्चयाने प्रसिद्ध अशी जी अमन वस्तू तिचे नांव वामन आहे. तो मनसहित मनादिकांचा द्रष्टा प्रत्यक आत्मा आहे. बळीराजा असत् जडदुःखरूप अनात्मरूप आहे. हा बोधरूपी वामनावावतार सत्त्व, रज व तम ही तीन पावले टाकतो म्हणजे त्यांचे मिथ्यात्व जाणतो आणि त्रिगुणातीत होतो.

**२३. वराहावतार :**

जीवाच्या पुण्यबळावर विवेकरूप वराह अविवेकरूप हिरण्याक्षाला मारून अविद्यारूप समुद्रातून

उद्धार म्हणजेच विचारांचे द्वारा सम्यक् वेदरूप ज्ञानाचे ठिकाणी प्रवृत्त करतो. हाच वराहावताराचा आशय आहे.

**२४. परशुराम :**

आत्मज्ञानीरूप परशुरामाने कामादि क्षत्रियांना (२१ X ४ = ८४ लक्ष योनीत जे शत्रू होते त्यांना) जिंकले.

**२५. नरसिंहावतार :**

आत्मनिश्चयरूप प्रल्हादाने अंत:करणरूप स्तंभातून नृसिंह आत्मबोधरूप नृसिंह उत्पन्न करून अज्ञानरूप जीव या हिरण्यकश्यपूस मारले म्हणजे त्याच्या अभावाचा निश्चय केला.

**२६. त्रिलोक :**

ज्यावेळी शरीरात अमानित्व, अहिंसादिक दैवी गुणरूप देवतांची अधिकता (बलिष्ठता) आणि कामक्रोधादिक दैत्यांची निर्बलता असते ते शरीर स्वर्गरूप होय. ज्यावेळी शरीरात कामक्रोधादि आसुरी गुणरूप दैत्यांची बलिष्ठता व अहिंसाब्रह्मचर्यादि दैवी गुणरूप देवतांची न्यूनता होते त्यावेळी ते शरीर पाताळरूप किंवा नरकरूप समजावे. दैवी व आसुरी गुणांचे शरीरात ज्यावेळी समत्व असते त्यावेळी ते भूलोक असते. ('नरकचि सारे मानव जैं मनीं तयांच्या काम । रामभक्त तैं खरे कबिरा स्मरती जैं निष्काम ।।', असे संत श्रीकबिरांनीही तदर्थक व सन्मार्गदर्शक विधान केले आहे.)

........................................................................................................................

*महायोगी श्रीअरविंद घोष म्हणतात, ''प्रयाग वगैरे भूपृष्ठांचे भौगोलिक वर्णन रूपकात्मक, अलंकारात्मक आहे. योगाच्या एका मानसिक-शारीरिक-प्रक्रियेतील कसोटीचा अनुभव या रूपकाने सूचित होतो. भौगोलिक वर्णने (नावे) ही आंतरिक विश्वाची निदर्शक आहेत, असे पुराणेच सांगत आहेत.'' (पहा : पृष्ठ क. १६३, भारतीय संस्कृतीचा पाया- श्रीअरविंद घोष, प्रकाशक श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरी-२, प्रथम आवृत्ती, (१९७१)) आणि, 'अनुभवें आले अंगा । ते या जगां देतसे ।।१।।' व 'विष्णुदास नामा म्हणे पहा देहीं शोधुनी रे', असे अनुक्रमे संत श्रीतुकाराम व संत श्रीनामदेव यांनी म्हटले आहे.

........................................................................................................................

**संदर्भग्रंथ :** 'अनुभवप्रकाश', पुष्कर प्रकाशन

........................................................................................................................

**- डॉ. विजय बाणकर,**
फ्लॅट क्र. बी - ११०९,
ग्रासलँड कोऑप. हाऊसिंग सोसायटी,
कोल्हेवाडी, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०
(९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## नामदेवांचे अभंग-आत्मचरित्र - भाग ७



संत नामदेवांना श्रीविठोबा म्हणतात- हे नामा, शंख, चक्र, गदा, पद्मासहित मी सतत तुझ्या सोबत असतो. तुम्ही माझे भक्त जिकडे जाल तिकडे मी भक्तांसोबतच असतो. संसाराचे ओझे मी तुम्हा भक्तांवर पडू देत नाही. मी सतत वैष्णवांच्या सांगाती राहतो. माझ्या भक्तांचे योगक्षेम मीच चालवितो. हे नामा, तू जसा मला विसरत नाही, तसाच मीही तुला कधी विसरत नाही. नामदेव देवास म्हणतात- हे देवा, मला सतत भक्ती, प्रेम, सुख मिळत राहो. तुझे नाम सतत माझे मुखी राहो. सद्भक्तीचे विचार सतत माझ्या चित्तात राहो. हे कृपामूर्ती देवा, मी पदर पसरवून तुम्हाला विनंती करतो. मला प्रेमभक्ती द्या.

**-नामदेव सदावर्ते**

सद्गुरू विसोबा खेचरांकडून गुरूप्रदेश प्राप्त झाल्याने आत्मज्ञानसंपन्न झालेल्या नामदेवरायांनी आपले आत्मचरित्र निवेदन केले आहे. हे सर्व आत्मनिवेदन अभंगरूप आहे. ते म्हणतात सद्गुरुंच्या उपदेशानंतर मला सर्वत्र आत बाहेर भगवंतच दिसत आहे. त्या सुखामुळे मी वेडावलो आहे. संत सहवासामुळे माझ्या बुद्धीचा पालट झाला आहे. सर्वत्र विठ्ठलाचे रूप पाहून माझा मीपणा आनंदात बुडाला. त्या आनंदातून माझे मन बहिर्मुख होत नाही. देवा, माझी एकच इच्छा आहे. हा स्वामी-सेवकपणा कायम राहू दे. हे देव-भक्त हे द्वैत कायम असू दे. ते एका अभंगात सूत्ररूप सांगतात.

**मने ध्यान करणे वाचे उच्चारणें ।**
**नयनी तूज पाहणे हेंचि देई।।**
**माथा चरणी ठेवणे करे पूजा करणे।**
**श्रवणी ऐके गुण हेंचि देई।।**
**मनसा वाचा कर्म आणि दशेंद्रिये ।**
**तुझ्या चरणी होय ऐसे करी ।।**
**नामा म्हणे केशवा मी तुझें लडिवाळ ।**
**जन्मोजन्मी जोड हेचि देई।।**

मनाने भगवंताचे ध्यान करावे. वाचेने नामोच्चार करावा. डोळ्यांनी देवाचे सगुण रूप पहावे. हे देवा, मला असे वरदान दे- माझे मस्तक संतचरण ठेवावे. हातांनी तुझी पूजा करावी व कानांनी तुझे गुण ऐकावे, असे जन्मोजन्मी मला दे. तुझी सेवा सतत घडो. तुझी सेवा जर घडली नाही तर माझे जीवन व्यर्थ गेले असे मी समजेन. या धरणीवर केवळ माझे ओझे होऊ नये म्हणून माझे जीवन सेवामय, भक्तिमय होऊ दे! नामदेवराय म्हणतात-

**काळ देहासी आला खाऊं।**
**आम्ही आनंदे नाचूं गाऊ।। १।।**
**कोणे वेळे काय गाणे।**
**हे तो भगवंता मी नेणें।।२।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**टाळ मृदंग दक्षिणेकडे।**
**माझे गाणे पश्चिमेकड।।३।।**
**नामा म्हणे बा केशवा ।**
**जन्मोजन्मी द्यावी सेवा।। ४।।**

हे देवा, तू तुझ्या भक्तांना श्रेष्ठ बनवितो. प्रेमाने तू भक्तांचे पालन करतोस. क्षणभरही भक्तांना तू जीवावेगळे करीत नाहीस. तू सतत भक्तांवर कृपा करतोस. देवाकडे ते स्वतःसाठी मागणे मागतात.

**पंढरीचा वास चंद्रभागे स्नान।**
**आणिक दर्शन विठोबाचें ।।**
**हेचि मज घडो जन्मजन्मांतरी।**
**मागणे श्रीहरी नाही दुजे।।**
**मुखी नाम सदा संतांचे दर्शन ।**
**जनी जनार्दन ऐसा भाव ।।**
**नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारी ।**
**कीर्तन गजरी सप्रेमांचे ।।**

भगवंताकडे वरील मागणे मागणारे संत नामदेव देवाच्या नाम-संकीर्तनाचे सुख मागतात. ते म्हणतात, कीर्तन व नामस्मरण हेच माझे संध्या-स्नान आहे. माझी रिद्धि-सिद्धि हीच आहे. कीर्तनात तल्लीन होणे हीच माझी सहज समाधी आहे.

**नामा म्हणे हेंचि देई गा श्रीपती।**
**कलेची विश्रांति जन्मोजन्मी।।**

हे देवा, तुझे नाम अमृताहून ही गोड आहे. ते नाम तू मला दे. तुझ्या गुणवर्णनासाठी मला ज्ञान दे. तुझ्या चरणांची आवड दे. तुझ्या नाम-चिंतनाशिवाय मी काहीही जाणत नाही. अंतर्बाह्य तूच मला सर्वत्र दिसतोस. तू सर्वव्यापक आहेस. इतकी वर्षे मी संसारात गुंतलो होतो. विषयांच्या मोहात माझे मन गुंतले होते.

**हेंचि देवा पैं मागत।**
**चरण सेवा अखंडित।।**
**वास द्यावा पंढरीचा।**
**सदा संग हरिदासांचा।।**
**जन्म हो कां भलते याति।**
**परि मी न चुके हरिभक्ति।।**
**नामा म्हणे कमळापती।**
**हेचि द्यावे पुढतों पुढती।।**

हातात विणा घेऊन मी देवळाजवळ उभा आहे. हे विठ्ठला, मला तुझी आवड असल्यामुळे मला तुझा छंदच लागला आहे. त्यात माझी तहानभूक हरवली आहे. मायबाप, कन्या-पुत्र आदी सर्वांची मला आठवणही येत नाही. हे देवा पांडुरंगा, मला फक्त तुझ्या पायावर डोके ठेऊ दे. हे विठ्ठला, संसारात काही वेळा दुःख येते. त्यामुळे मी उदासीन होतो. तेव्हा मला तुझे ध्यान लागो, त्यावेळी तुझ्या नामस्मरणात मला तल्लीन होऊ दे. हेच माझे तुझ्याकडे सतत मागणे आहे. योग्य प्रसंग येताच तू माझ्या अंतरी प्रकट होतोस. तुझ्या नामाची गोडी माझ्या चित्ताला लागो.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



**नामा म्हणे शरण आलो मी केशवा।**

**हाचि तूं पुरवावा मनोरथ ।।**

शरीर प्राणांचे बलिदान देऊन भक्ती-प्रेम सुख मिळवावे. हेच मस्ती-प्रेम देवाकडे मागावे. हरिकथेविषयी प्रेम, संत सहवास यानेच भगवंताची प्राप्ती घडते. विषयात विरक्त व भगवंताच्या नामावर श्रद्धा, आणि हृदयात श्रीकृष्णमूर्ती असावी. सर्व प्राणीमात्रांवर प्रेम-करुणा आणि सर्वभ विठोबाची अनुभूती मिळावी. हेच माझे मागणे आहे. भगवंताचे नामस्मरण करताना अष्टसात्विक भाव जागृत होऊन डोळे ओले झाले नाही तोपर्यंत हरिभक्तिचे सुख कळणार नाही. हे देवा, अशी प्रेमरूप भक्ती मला दे. तुझे नामस्मरण करताना तुझी सेवा घडो.

हे पंढरीनाथा, देवाधिदेवा, तूच एक समर्थ आहेस. तूच देणारा आहेस. तूच दाता आहेस. तू ज्यांना खूप धनसंपत्ती दिली, ते लोक त्यातीलच थोडे धन दुसऱ्यास देतात व स्वतःस दानशूर म्हणवून घेतात. ते आज देतात, पुन्हा उद्या देत नाहीत. हे देवा, तू असा दाता आहेस की, ज्याला तू धन दिले ते कदापि संपत नाही. तू समर्थदाता आहेस.

हे देवा, माझे मागणे अगदी थोडे आहे. तू तर देणारा लक्ष्मी-पती आहेस. खूप पाऊस पडतो पण चातक पक्षी चोचभर पाणी घेतो व समाधान पावतो. महाडोहात खूप पाणी असते, आपण दोन ओंजळी पाणी घेऊन तृप्त होतो. हे देवा, मी तुझा सेवक आहे आणि तू तर उदारांचा राजा आहेस. नामदेवराय म्हणतात-

**नामा म्हणे देवा तुझे न लगे मज कांहीं।**

**प्रेम असों दे चित्ती म्हणोनि लागत से पायीं।।**

हे देवा, तू पतितपावन आहेस, असे ऐकून मी तुझ्या द्वारी आलो. पण तूं पतितपावन नाहीस, असे वाटले म्हणून मी तुझ्या दारातून परत माघारी फिरलो आहे. कारण तू कुणाचेही गुण दोष न पाहता सर्व देणारा दाता आहेस, असे मला वाटले होते. पण तू प्रथम भक्ताचे सर्व घेतो व मग थोडेसे देतो, असा तू उदार आहे. हे देवा, तू तर कृपण आहेस. मोठ्या आशेने तुझी कृपा व्हावी म्हणून तुझ्या दारी यावे आणि तुझा कृपणपणा कळल्यावर माघारी फिरावे लागते. पण देवा, तुझे आम्हाला काहीही नको. तुझे प्रेम हवे आहे.

**भावे तुझे चरण धरिले विठ्ठला।**

**आतां तूं पांगिला करू नको ।।**

**न लगे मज काहीं ऋद्धिसिद्धी पाही।**

**मुक्तिसुख तेंहि न लगे मज।।**

**नामा म्हणे मज जन्म दे अनंता।**

**भक्तिविरहिता जिणे नको।।**

हे देवा, तुझ्या चरणांच्या प्राप्तीने किती अनुपम्य सुख मिळते. हे तुला जाणता येणार नाही. कारण त्यासाठी भक्त व्हावे लागते. ब्रह्मादिकांनाही तुझ्या चरणांचे सुख कळणार नाही, भगवंताच्या चरणी निरंतर सुख आहे. हे माता रुक्मिणीदेवीस माहीत आहे. देवाच्या चरणाचे सामर्थ्य त्या गौतम ऋषींच्या पत्नीस माहीत आहे. शापबद्ध अहिल्या श्रीरामप्रभूंच्या चरणस्पर्शानेच मुक्त झाली. तसेच वैष्णवभक्तही या चरणांचा महिमा जाणतात. सारे संतजन या श्रीविठ्ठलाच्या चरणांचे सुख जाणतात. नामदेवराय म्हणतात-

**पूर्णकृपा केली देवा।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

दिधली पादपद्म सेवा।।
पापे पळाली पळाली।
नाम संकीर्तन कल्लोळी।।
दारी तुळसी वृंदावन।
अखंड नामसंकीर्तन।।
रंगमाळा रंगणी।
तेथे मुक्ति वाहती पाणी।।
जन्म वैष्णवांकुळी यावा।
घडो संतांची हे सेवा।।
नामदेवा आवडी ।
संतचरणी देतो बुडी।।

संत नामदेवांना श्रीविठोबा म्हणतात- हे नामा, शंख, चक्र, गदा, पद्मासहित मी सतत तुझ्या सोबत असतो. तुम्ही माझे भक्त जिकडे जाल तिकडे मी भक्तांसोबतच असतो. संसाराचे ओझे मी तुम्हा भक्तांवर पडू देत नाही. मी सतत वैष्णवांच्या सांगाती राहतो. माझ्या भक्तांचे योगक्षेम मीच चालवितो. हे नामा, तू जसा मला विसरत नाही, तसाच मीही तुला कधी विसरत नाही. नामदेव देवास म्हणतात- हे देवा, मला सतत भक्ती, प्रेम, सुख मिळत राहो. तुझे नाम सतत माझे मुखी राहो. सद्भक्तीचे विचार सतत माझ्या चित्तात राहो. हे कृपामूर्ती देवा, मी पदर पसरवून तुम्हाला विनंती करतो. मला प्रेमभक्ती द्या.

नामा म्हणे देवा इतुके द्यावे मज।
ऐकोनि केशवराज काय बोलें।।
घेरे घेरे नाम्या दिल्हे माझे प्रेम।
घोकी माझे नाम सर्वकाळ ।।
शिरावरी हात ठेवितसे माझ्या।
अभिमान तुझा गेला म्हणुनि ।।
भक्ति-सुख देवे दिल्हे नामयातें ।
नामा परमामृते तृप्त जाला ।।
नामा म्हणे देवा जालो मी पावन ।
माझे तुजविण कोण आहे ।।

हे देवा, मायबापापेक्षा तुझी माझ्यावर कृपादृष्टी आहे. माझे जातिकुळ न विचारतां तू माझे संकटात रक्षण केले आहे. प्रेमभात खाऊ घालून तू माझे पालनपोषण केले आहे. माझ्यावर तळहाताची सावली धरली आहे. दाही दिशा निर्मळ असताना माझा देव येईल व मला मिठीत घेईल. माझी जिवलग माऊली भेटताच भक्ती-प्रेमाचा महापूर येईल व माझ्या जीवनात सुखसिंधू येईल.

प्रीतिचे पडिभरें कुर्वाळिल मज।
सांगेल निजगुज संसारीचें।।
हरुषें नामा निवाला निवाडे।
नाचे संतांपुढे सांगेन गुज।।

संत नामदेव एका अभंगात पंढरीचे वर्णन करतात. पंढरी हे तीर्थक्षेत्र माझे माहेर असून तेथे श्रीविठ्ठल ही

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

माझी आई आहे. त्या माझ्या माऊलीस माझा हा निरोप सांगा. हे देवा, तुमची एक लेक सासुरवासात संसारगावी आहे. तुम्हाला तिचा विसर पडला आहे का? तुम्हाला तिची काहींच काळजी दिसत नाही. तुमची लेक तिकडे वाट पाहत आहे. तेथे अविचाररूपी भाऊ माझा सतत अव्हेर करीत असतो. आशा तृष्णा या दोन जावा मला एकटीला खूप त्रास देतात. त्यावेळी मी एकांतात तुमची आठवण काढीत बसते. सासू चांडाळ, पापिणी तीसुद्धा मला खूप छळते. तेथे सतत अहोरात्र कष्ट, काम करावे लागते. थोडीसुद्धा विश्रांती मिळत नाही. जीवनाचा विट येतो. कधीही सख्या-मैत्रिणींची भेट होत नाही आणि अज्ञान पोटी वाढतच आहे.

**सुखाचे डोहळे दुःख कीं नावडे।**
**ऐसे केवि घडे तुजविण।।**
**रखुमाई माता पांडुरंग पिता।**
**मी त्याची दुहिता म्हणे नामा।।**

निरंतर भक्तांची वाट पाहणाऱ्या पांडुरंगाने सर्वप्राणीमात्रांसह सर्व मानवांना आपलेपणाने सांभाळले आहे. संसारात अनेक दुःखाचे प्रसंग घडतात. भगवंत आपल्या भक्तांना ते दुःख जाणवू देत नाही. नामा दुःखी झाला. त्या वेदना त्याने स्फुंदत स्फुंदत देवाला सांगितल्या. ते कारुण्यपूर्ण बोलणे ऐकून पांडुरंग मनात हसले व त्यांनी ती दुःख विवंचना रखुमाईस सांगितली. नामदेवाला राऊळात घेऊन ये असे सांगितले. मग श्रीविठ्ठलासह रुक्मिणीमाता, ज्ञानदेव, पुंडलिक हे सारे नामदेवाजवळ आले. पुंडलिक म्हणाला, हे नामदेवा, तुझा हा एकनिष्ठ भाव धन्य आहे. स्वतः भगवंत व माता तुला राऊळात घेऊन जाण्यासाठी आले आहेत. पितांबराच्या तेजःपुंज रूपाने प्रगट होऊन पांडुरंग आले. त्यांनी नामदेवास प्रेमाने आलिंगन दिले.

**नामयासि घेऊनि आले पंढरीसी ।**
**वैकुंठ ओवारिसी कळस केला।।**
**नामयाच्या मुखी घालुनि कवळु।**
**पुसे हा गोपाळु सिणभाग।।**

अनेक प्रसंगी नामदेव रुसत असे व भगवंत त्याची समजूत घालून मंदिरात घेऊन येत असत. श्रीविठ्ठल व नामदेव हे देव-भक्त एकरूप झाले होते. नामदेव देवास म्हणतात- या संसारात अनेकजण पतित आहेत. ते सर्व आर्ततेने तुझी भक्ती करतात. त्या पतितांचा उद्धार करणारा पतितपावन तूच एकमेव आहेस. तुला आम्ही भक्तांनीच पतितपावन मानले आहे. संसारात अनेक पतित जीव आहेत. म्हणून तुझे महत्त्व अधिक आहे. त्यांना पावन करण्यास समर्थ असा तू एकटाच आहेस. लोखंड आहे, म्हणून परिसाचे महत्त्व आहे. याचकांच्या मनोरथात अनेकविध आशा, कल्पना आहेत. म्हणून कल्पतरूंचे महत्त्व आहे. हे देवा, आम्ही सारे तुझे भक्त दीन आहोत, म्हणून तू दीनबंधु शोभतोस.

**विषयाचे आळुंके जरी नव्हतो दीन।**
**तरी दीनानाथा कोण म्हणती तुज ।।**

नामदेवराय म्हणतात- मी माझ्या मनाशी खूप विचार करून असा एकच निर्धार केला आहे की, मला मुक्ती आणि ते ब्रह्मज्ञान नको. त्यापेक्षा पंढरीच्या मंदिराची दगडी पायरी खूप चांगली आहे. हे देवा, तुझ्या मंदिराच्या दगडी पायरीपाशी अखंड तुझी कीर्ति, गुण गात राहीन. विठ्ठलमूर्ती सर्वत्र विश्वात पाहीन. हे देवा, तुझ्या नामरूप अमृताचे मी सतत प्राशन करीन. त्यामुळे अनेक जन्मांतील दुःखांचा मला विसर

पडेल. ते म्हणतात-

**वतन आमुचे मिरास पंढरी।**
**विठोबाची घरी नांदणूक।।**
**सेवा करू नित्य नाचूं महाद्वारी।**
**नामाची उजरी जागवू तेथे ।।**
**साधुसंता शरण जाऊ मनोभावे।**
**प्रसाद स्वभावे देती मज।।**
**नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे।**
**संत पाय हिरे देती वरूं।।**

पंढरीच्या महाद्वारात हे महासुख आहे. संतांच्या पायांची धूळ लागावी म्हणून मी ही निवांत जागा शोधली आहे. तेथेच माझ्या चित्ताला समाधान लाभते. नामदेवराय म्हणतात-

**महाद्वारी सुख असे या सुखाचे।**
**लागती संतांचे चरणरज।।**
**म्हणोनिया स्थळ पाहिले निवांत।**
**जाले चित्त तेथे समाधान।।**
**सकळ वैष्णवांसहित बोळवण करा।**
**तुम्ही हो दातारा मजलागी ।।**
**देव म्हणे नाम्या राहे पक्षभरी।**
**पुरतील अंतरीचे कोड तुझे।।**

देव नामदेवास म्हणतात- महाद्वारी दगडी पायरीवरील संतांची पायधूळ माथी मिरविण्यासाठी तू महाद्वारी दगडी पायरीवर अखंडपणे राहू इच्छितोस, तसाच मीसुद्धा तुम्हा भक्तांची पायधूळ सदैव लागावी म्हणून भक्तांच्या मागेमागे हिंडत असतो. देव म्हणतात-

**त्याची पायधूळ लागावी सर्वांगे।**
**म्हणोनि मागेमागे हिंडतसे।।**
**चिंता न करी नामया नुपेक्षी सर्वथा।**
**अभय करू माथा ठेविला देवे।।**
**संत नामदेवास वंदन!**

**- नामदेव सदावर्ते,** नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आनंद हा जन्मसिद्ध हक्क

**निष्ठावंत म्हणजे कोण? हा खरंच कठीण प्रश्न आहे. निर्व्याज स्थैर्य म्हणजे निष्ठा. मग हे स्थैर्य कशाच्या संबंधी असावे? माझ्या भाषेत सांगायचे तर निष्ठा म्हणजे आपले जे इष्ट असेल त्याला घट्ट चिकटून राहणे व इष्टसंबंधी स्वप्नातही चुकूनही कधी संशयाला जागा नसावी. नित्य दृढता, स्थिर, आसक्तपूर्ण, भक्तीने, अनुप्रयोगात राहून कौशल्यपूर्ण व विशिष्ट ज्ञान त्याच्यासंबंधी मिळवित राहणे म्हणजे निष्ठा होय. जो ही निष्ठा ठेवतो, तो निष्ठावंत होय.**

**-बंडोपंत कुलकर्णी, पुणे**

**निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म ।**
**निर्धार हे वर्म चुको नये ।।**
**निष्काम निश्चळ अंतरी विश्वास ।**
**पाहू नये वास आणिकांची ।।**
**तुका म्हणे ऐसा कोण ऊपेक्षिला ।**
**नाही ऐकिला पाहिला ऐसा कोणी ।।**

हा अभंग वाचताना जितका सुलभ वाटतो तितका तो नाही. हा अभंग तुम्हीच तुमचे चारित्र्य तपासा म्हणून सांगणारा आहे. येथे स्वतःच्या स्वतःवर असलेल्या विश्वासाला डिवचण्याचा प्रकार आहे. जर आपण आपल्यावरील आपल्याच विश्वासाच्या खरेपणात उतरण्यात अयशस्वी झालो तर आपले मनोधैर्य खचू शकते. संतांनी गोड बोलून, शालीन भाषेत, खोचक भाषेत, टोमणे मारून वा प्रसंगी शिव्या घालून साधकांना या कल्याण पथावर आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा अभंग शालीन भाषेत साधकांच्या काळजाला इजा करणारा आहे. आपण हा अभंग समजावून घेऊ.

निष्ठावंत म्हणजे कोण? हा खरंच कठीण प्रश्न आहे. निर्व्याज स्थैर्य म्हणजे निष्ठा. मग हे स्थैर्य कशाच्या संबंधी असावे? माझ्या भाषेत सांगायचे तर निष्ठा म्हणजे आपले जे इष्ट असेल त्याला घट्ट चिकटून राहणे व इष्टसंबंधी स्वप्नातही चुकूनही कधी संशयाला जागा नसावी. नित्य दृढता, स्थिर, आसक्तपूर्ण, भक्तीने, अनुप्रयोगात राहून कौशल्यपूर्ण व विशिष्ट ज्ञान त्याच्यासंबंधी मिळवित राहणे म्हणजे निष्ठा होय. जो ही निष्ठा ठेवतो, तो निष्ठावंत होय.

माणसांचा माणसावर विश्वास राहिलेला नाही. जोपर्यंत माणूस या वैषयिक संसारात असेल, तोपर्यंत विषय लोभामुळे अविषयाशी प्रामाणिक राहू शकत नाही. माणूस संपून देवत्व प्राप्त करतो, तेव्हाच विषय सुटलेले असतात. विषयमुक्त झाल्यावर माणसाला देवत्व प्राप्त होते म्हंटले तर अतिशयोक्ती होणार नाही. भक्त तो, जो त्याच्या इष्टापासून विभक्त नाही. म्हणजे भक्त हा ईश्वरापासून कधीच विभक्त नसतो. म्हणून भक्त हा एकमेव वर्ग आहे, जो या पृथ्वीतलावर निष्ठावंत आहे. या निष्ठेसमोर ईश्वर हतबल होतो. माऊली म्हणते,

**भक्तांकारणे येणे घेतलीसे आळी।**
**दहा गर्भवास सोशी वनमाळी।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

राहिला प्रश्न इतर लोकांचा. इतर जे लोक स्वतःला निष्ठावंत म्हणवून घेतात वा सांगतात, ते धादांत खोटे बोलतात. त्यांची निष्ठा तकलादू असते. कारण सर्वात कठीण म्हणजे भक्ती आहे. अप्रत्यक्ष ईश्वराशी एकनिष्ठ वा निष्ठावंत राहणे महाकठीण आहे. तुकाराम महाराज म्हणतात,

**रूप नाहीं रेखा जयासी आकार।**

**आम्हीं तो साकार भक्तीं केला ।।**

यापुढे तुकोबाराय म्हणतात, तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे। येरा गाबाळाचे काय काम।। जेव्हा भक्ती ही आपल्या अंतिम स्तरावर असते, तेव्हा भक्त आपोआपच निष्ठावंत होतो. कारण ईश्वराशी निष्ठावंत राहणे हे भक्ताचे मूलभूत लक्षण व गुण आहे. भक्ताचे भक्तीमार्गातून पतन झाल्यावर तो निष्ठावंत राहत नाही. भक्तीमार्गातून पतन घडू नये म्हणून दृढ निर्धाराने ईश्वर ध्यान, नामस्मरण, चिंतन व सेवेत गर्क राहावे व त्यालाच जीवन समजून नित्यनेम करावे. म्हणून तुकोबाराय म्हणतात,

**निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म ।**

**निर्धार हे वर्म चुको नये।।**

या अभंगातील दुसरे चरण हे वर चिंतन केलेल्या चरणाशी संदर्भीत आहे. या चरणात भक्तीचे विस्तारवर्णन आहे. निष्काम या संज्ञेचे अनेक अर्थ आहेत. अनिच्छा, विनासक्ती, कोणत्याही प्रकारच्या फलाची अपेक्षा न करता केलेले कर्म, तटस्थ वा विनाआकांक्षा साक्षीभावाने मानसिक कर्म, असे अनेक अर्थ आहेत. तथापि, यातील अध्यात्मास अभिप्रेत अर्थ म्हणजे फलाची अपेक्षा न करता तटस्थ साक्षीभावाने केलेले कर्म म्हणजे निष्काम कर्म होय. सांख्य आणि गीता इत्यादींच्या मताने असे कार्य केल्याने मन शुद्ध होते आणि मुक्त होते. निश्चळ म्हणजे अचल, स्थिर व अपरिवर्तनशील.

तुकोबाराय हे भक्तांना आपल्या ध्येयापासून दूर जाऊ नका म्हणून सांगत आहेत. तुम्ही तुमचा इष्ट ईश्वर यावर दृढ विश्वास ठेवावा. तो विश्वास ठेवत असताना आपला भाव निष्काम व निश्चळ पाहिजे. शिवाय, तो विश्वासही निष्काम व निश्चळ हवा. त्याच्याशिवाय पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, देहातील पंच महाभूते, मन, बुद्धी, चित्त, अहंकार वगैरे सर्व तत्त्वात फक्त आणि फक्त इष्ट ईश्वर भरलेला असावा व तोच भरलेला आहे, असा दृढ विश्वास ठेवावा. तेथे वैकल्पिक ईश्वर वा अन्य देवतांना स्थान नसावे. माऊली म्हणते,

**आकरावरी सातवे होते।**

**सातवे कोठे मावळलेगे माये।।**

**सहस्राची भरोवरी जालीगे माये ।**

**लयलक्षी पाहे तव चोजवेना।।**

**रखुमादेवीवरू दोन्ही घेतली ।**

**विरूनी टाकली ब्रह्मडोई ।।**

जरी ईश्वर जळी, तळी, काष्टी व पाषाणी व सर्व जीव जंतूंत भरून असला, तरी त्याच्या प्राप्तीपर्यंत इष्ट तेवढाच आपल्या देहात वास करावा. कारण अनेकात मन रमल्यावर मन विचलित होते. संत जनार्दन महाराज म्हणतात

**काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल ।**

**नांदतो केवळ पांडुरंग ।।**

**दश इंद्रियांचा एक मेळा केला ।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**ऐसा गोपाळकाला होत असे ।।**

**देखिली पंढरी देही-जनी-वनी ।**

**एका जनार्दनी वारी करी ।।**

जनार्दन महाराजांनीसुद्धा तेच सांगितले. उदाहरण पाहू. लग्नाचे वय झाल्यावर मुलगा-मुलगी, वधू-वर परीक्षेस सामोरे जात असतात, तेव्हा पाहिलेली प्रत्येक मुलगी-मुलगा क्षणभर आपली पत्नी-पती आहे, असे वाटते. पण जेव्हा लग्न होते, तेव्हा नजरेत कितीही स्त्रिया दिसल्या तरी त्या सर्व स्त्रियांत फक्त एकमेव स्त्री पत्नी म्हणून दिसते, नव्हेतर तीच पत्नी असते. उर्वरित सर्व स्त्रिया वा इतर नाती असतात. म्हणजेच मन विचलित होत नाही. त्याचप्रमाणे मन निष्काम व निश्चळ विश्वासाने निपुण असावे. म्हणून संत सांगतात,

**निष्काम निश्चळ अंतरी विश्वास ।**

**पाहू नये वास आणिकांची ।।**

शेवटच्या चरणात निष्काम व निश्चळ विश्वास व देह इष्ट ईश्वरांने भरलेल्या साधनेची फलश्रुती सांगितली आहे. उपेक्षा म्हणजे औदासिन्य वा दुर्लक्षित. उपेक्षित व्यक्तीच्या विचारांमध्ये तीव्र विसंगती असते आणि त्याला वैचारिक संघर्षाचा सामना करावा लागतो. ना त्याला कुठल्याही वस्तूमध्ये रस असतो, ना कुठल्या कामात त्याचा उत्साह असतो. सामान्यतः ज्या गोष्टी भावनांना उत्तेजन देत मानसिक आजाराला बळी पडतात. हे का घडते, तर एकतर आजारामुळे अथवा ईश्वरकृपेचा अभाव. यात ईश्वराचा सहभाग नसतो. कारण तो ईश्वराकडे भक्त होण्यास गेलेलाच नसतो. तो सकाम गेलेला असतो. तेव्हा भगवंत शांत असतो व त्याला त्याच्या कर्मावर सोडतो. पण जो ईश्वरभक्तीत लीन होतो, त्याचा अव्हेर वा उपेक्षा भगवंत कधीच करीत नसतात. उलट त्याचे कर्म स्वतःकडे घेतात. म्हणून भगवंत उपेक्षित भक्त सापडणे नाही.

अशाच प्रकारे फलश्रुती ज्ञानेश्वरीत सांगताना माऊली म्हणते,

**आपुला ठाय न सांडिता।**

**आलिंगिजे चंद्रु प्रकटता।**

**अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणे।।**

**आकर्षोनि चित्त चैत्यन्य। भरोनी ठेले लोचन।**

**ध्यानी विसर्जिले मन। बोली अरूपाचे रूप दावीन।**

**अतिंद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवी ।।**

**जे मन बुद्धी इही । घर केले माझां ठायी ।**

**तरी सांगें मग काई ।मी तूं ऐसे उरे ।।**

नामदेव महाराज म्हणतात,

**नामा पाहे देही तंव उभा चहूं बाही।**

**दिशाद्रुमित दाही हरि दिसे।।**

बहिणाबाई म्हणते,

**देहाचा पालट विठोबाचे भेटी ।**

**जळ लवणां गांठी पडोन ठेंली ।।**

**धन्य मायबाप नामदेव माझा।**

**तेणें पंढरिराया दाखविले ।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायीं ।**
**चित्त ठायीचे ठायी मावळले।।**

ज्याने इष्ट ईश्वरावर निष्काम व निश्चळ विश्वास ठेवला, त्याला तो प्राप्त झाला. ईश्वराची उपेक्षा केली व त्यास इष्ट प्राप्त झाला असं एकही उदाहरण शोधूनही सापडणार नाही. संत रामदास स्वामी म्हणतात,

**अनंताचा अंत पहावया गेलों।**
**तेणें विसरलों आपणासी।**
**आपणा आपण पाहतां दिसेना ।**
**रूप गवसेना दोहींकडें दोहीकडे ।।**
**देव आपणची आहे ।**
**संग हा न साहे माझा मज माझा मज ।।**
**भार जाहला बहुत ।**
**देखतां अनंत कळों आला ।।**
**कळों आला भार पाहिला विचार ।**
**पुढें सारासार विचारणा ।।**
**विचारणा जाली रामीरामदासीं ।**
**सर्वही संगासी मुक्त केलें ।।**
**मुक्त केले मोक्षा मुक्तीची उपेक्षा ।**
**तुटली अपेक्षा कोणी एक ।।**

सर्व संतांचा अनुभव सारखाच आहे. मग ज्याने ईश्वराची उपेक्षा केली, त्याने काहीच मिळविले नाही. उलट स्वतःच उपेक्षित राहिला. म्हणून संत म्हणतात,

**तुका म्हणे ऐसा कोण ऊपेक्षिला ।**
**नाही ऐकिला पाहिला ऐसा कोणी ।।**
**कृष्णार्पणमस्तू । आत्मा मालिक ।**

**- बंडोपंत कुलकर्णी,**
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, सोलापूर

***

## ऐसी कर्मगती : ऐसा ध्यानी ज्ञानिया : भाग ५



### ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान

मनाचा मार्ग सोडून साधुमार्गाने गेले की श्रीपती आकळतो, समजतो. वाचेत सतत रामकृष्ण जप आणि आत्मारामी सातत्याने शिवाचा जप हा जीवांचा भाव असावा. द्वैताचे बंधन टाकून एकतत्त्वाने हरिनाम साधन व तेच साध्य साधता येते. एकदा नामामृताची गोडी वैष्णवांना लाभली की त्यांना जीवनकळाच प्राप्त होते. ह्याच नाम अमृतामुळे प्रल्हाद भक्त घडला आणि उद्धवाला कृष्णकृपा झाली. नामपाठ करणे हे सर्वाधिक सुलभ आहे, तथापि हे जाणणारे फार दुर्लभ आहेत. असे माऊली सांगतात.

-डॉ. सुनील शिंदे

आत्म्याची महती हरीपाठात कथन करताना माउली सर्वांघटी तो स्थित आहे, असे प्रतिपादन करतात. सर्वांठायी असणारा आत्मा जाणून घेण्यासाठी आवाहन करतात. भावभक्ती श्रेष्ठ. नामस्मरण मोलाचे. ज्यास भक्ती नाही तो तर पतित अभक्त. पातकाचे पर्वत आपल्या कर्माने उभारणे अनुचित आहे, ही माउलींची स्पष्टोक्ती. जन्मासी येऊन भक्ती करणे तर आवश्यकच. सर्वांघटी असणारा आत्मा हाच परमात्मा. अशावेळी वज्रलेपासारख्या पापांचे धनी होऊ नये याची दक्षता आवश्यक.

**पर्वताप्रमाणे पातक करणे।**
**वज्रलप होणे अभक्तांसी।।१।।**
**नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त।**
**हरीसी न भजत दैवहत।।२।।**
**अनंत वाचाळ बरळती बरळ।**
**त्यां कैंसा दयाळ पावे हरी।।३।।**
**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान।**
**सर्वांघटीं पूर्ण एक नांदे।।४।।**

(आशय : जो हरिनामाला सन्मुख होत नाही, त्याला पर्वताएवढी पापे वज्रलेपाप्रमाणे (न वेगळी होणारी) चिकटतात. ज्यांना जन्माला येऊन भक्ती करता येत नाही, तो तर पतित अभक्त ठरतो. हरिनाम न घेता फक्त संसाराविषयी अनेकविध गप्पाच रंगवतो, त्याला तो श्रीहरी कसा काय प्राप्त होईल? सर्वघटांमध्ये असणारा तोच परमात्मा या जगताचे प्रमाण आत्माराम आहे, असे माऊली कथन करतात.)

संतसंगती अर्थात् संतांचे सान्निध्य तारणारे. मनाचे संतुलन स्थिरता आवश्यक आहे . सन्मार्ग तसेच संत सज्ञनांचा सहवास अनमोल आहे. संतांचा मार्ग भगवंत समजून घेण्यासाठी सहाय्यभूत ठरतो. श्री रामकृष्ण नामाचा जप तारणारा आहे. आत्मारामी राहून शिवाचा, श्री भोलेनाथाचा नामजपही

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

भावना शुद्धीतून असावा. हरीनामाची गोडी खरेतर अमृताची अनुभूती. भक्त प्रल्हादासह उद्धव नाममहात्म्यानेच तर तरले, उद्धरुन गेले. नाम सर्वाधिक सुलभ-सोपे असले तरीदेखील हे समजून उमजून घेणारे मात्र विरळाच सापडतात!

**संतांचे संगती मनोमार्गगती।**
**आकळावा श्रीपति येणे पंथे॥१॥**
**रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा।**
**आत्मा जो शिवाचा राम जप॥२॥**
**कर्तृत्व नाम साधिती साधन।**
**द्वैताचे बंधन न बाधिजे॥३॥**
**नामामृत गोडी वैष्णवां लाधली।**
**योगियां साधली जीवनकळा॥४॥**
**सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला।**
**उद्धवा लाधला कृष्णदाता॥५॥**
**ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ।**
**सर्वत्र दुर्लभ विरळा जाण॥६॥**

(आशय : मनाचा मार्ग सोडून साधुमार्गाने गेले की श्रीपती आकळतो, समजतो. वाचेत सतत रामकृष्ण जप आणि आत्मारामी सातत्याने शिवाचा जप हा जीवांचा भाव असावा. द्वैताचे बंधन टाकून एकतत्त्वाने हरिनाम साधन व तेच साध्य साधता येते. एकदा नामामृताची गोडी वैष्णवांना लाभली की त्यांना जीवनकळाच प्राप्त होते. ह्याच नाम अमृतामुळे प्रल्हाद भक्त घडला आणि उद्धवाला कृष्णकृपा झाली. नामपाठ करणे हे सर्वाधिक सुलभ आहे, तथापि हे जाणणारे फार दुर्लभ आहेत. असे माऊली सांगतात.)

आत्मारामी राम अर्थात् आत्मदेव आणि त्या भगवंताचे सातत्याने स्मरण हे कलियुगीचे शक्तीस्थान आहे. माउली अशा आत्मारामाचे मोल समजावून सांगताना नामपठणाचे, नामजपाचे महत्त्व परोपरीने समजावून देतात. माउली ध्यानी ज्ञानियाचे आत्मस्थितीचे हे विश्लेषण तोलामोलाचे आहे.

**- डॉ. सुनील शिंदे**

'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी',
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहिल्यानगर

✻✻✻



## आत्मा जाणावा अंतरी

**भक्ताची श्रीगुरूवर नितांत श्रद्धा पाहिजे. श्रीगुरू हे ईश्वर परब्रह्मस्वरूप असतात. गुरूंना अनन्यभावे शरण जावे. काया, वाचा, मने त्यांची नित्य सेवा करावी. गुरूसेवा हीच ईश्वरसेवा होय. महर्षी नारद यांनी निवेदिलेल्या नारदीय नवविधा भक्तिनुसार श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन केलेल्या श्रीगुरू भक्तीतून भक्ताचा आत्मोद्धार होतो. आत्मोन्नत झाल्याने जीवाला ईश्वरभेटीची ओढ लागते.**

**-बी.के. गायकवाड**

परमात्मा या संपूर्ण अनंत कोटी ब्रह्मांडाचा निर्माता आहे. विश्वातील संपूर्ण सृष्टीची निर्मिती, स्थिती, लय आणि पुनर्निर्माण करविता आहे. तसेच सर्वांचे रक्षण, पालन-पोषण करणारा आहे. सृष्टीतील असंख्य सजीवांतील मानव एक जीव आहे. पंचमहाभूतात्मक शरीर आणि मन, बुद्धी, अहंकारयुक्त अष्टदा प्रकृतीच्या मानवास ईश्वराने इतर सर्व प्राण्यांपेक्षा अधिकतम विशेष बुद्धी दिलेली आहे. या संपन्न बुद्धी विवेकांमधून या परमात्म्याला पाहण्याचा, जाणून घेण्याचा यत्न प्रथमपासून अनेक ईश्वरभक्त आपल्या परीने करतात.

परमात्म्याचे अविनाशी आत्मतत्व सर्वत्र व्यापून उरले आहे. ईश्वरस्वरूप आत्मा निर्गुण, निराकार, अविनाशी आहे व तो चराचरांत आहे. सृष्टी ही चेतन आहे. सृष्टीतील चेतना ही आत्म्याच्या चैतन्याचा आविष्कार आहे. आत्मा हाच सर्व प्राणीमात्रांच्या शरीरातील जीवात्मा आहे.

पिंडी ते ब्रह्मांडी या उक्तीनुसार सृष्टीतील पंचमहाभूतांचे पदार्थ गुणतत्वासह या देवतामय शरिरास जीवात्मा अहंकारासह धारण करतो. वास्तविक हा अहंकार 'मी' तोच आहे. 'ब्रह्मस्वरूप आत्मा' हा आहे. प्राप्त मन, बुद्धीवर अनेक जन्मांच्या संस्काराने जीवात्मा शरीराला स्वतः मी समजतो. हा केवळ प्रकृती मायेचा बंध असतो.

ही पंचमहाभूतात्मक प्रकृती व त्याअंतर्गत पूर्ण सृष्टी ही ईश्वराच्या दिव्य मायेतून निर्माण झालेली आहे आणि ती त्रिगुणात्मक आहे. सर्व प्राणिमात्र सत्त्व, रज, लय गुणांनी बद्ध असतात. मनुष्य जीवन जगताना या गुणांच्या प्रभावाखाली राहतो. प्राप्त शरिराचे रक्षण व त्याच्या जीवनावश्यक गरजा जसे की, अन्न वस्त्र आणि निवारा यासाठी मनुष्य आयुष्यभर विविध कर्माचरण करतो. त्याकडून नित्य, विहित, नैमित्तिक अशी कर्मे आचरण्यात येतात. वरील त्रिगुणातील ज्या गुणांचा कर्मावर अधिक प्रभाव असेल, त्यानुसार त्याची फलप्राप्ती कर्म करणाऱ्याला होत असते. जगात देणारे, घेणारे हे आपले कर्मच असते. यासाठी संत म्हणतात, कर्म सात्विक भावाने सावधानतेने करावीत, ती ईश्वराप्रति कर्तव्यभावनेने आचरावित व त्याची फलाशा न ठेवता ती ईश्वराला समर्पित करावीत. कर्माच्या कर्तेपणाचा अहंकार मुळीच ठेवू नये. अशा प्रकारे जो मनुष्य ईश्वराला स्मरून सात्त्विक कर्माचरण करतो, अशी कर्मे निष्काम कर्मे होतात व सुख-दुःखापासून बंधनमुक्त ठेवतात. ही जीवाची जीवन्मुक्त मोक्ष अवस्था

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

होते.

संत सहवास, सत्संगती यातून मनुष्याच्या जीवनात अमुलाग्र बदल होतात. अंगी सात्त्विकता येते. मनाला ईश्वरभक्तीची आवड निर्माण होते. ईश्वराचे स्वरूप जाणावे याची जीवाला जिज्ञासा उत्पन्न होते. अशातच भक्तिमार्गात श्रीगुरूंची भेट होणे म्हणजे जीवाचे परमभाग्य होय. श्रीगुरू भक्ताला काही साधने, अनुष्ठान देतात व त्याचा अभ्यास करवून घेतात.

भक्ताची श्रीगुरूवर नितांत श्रद्धा पाहिजे. श्रीगुरू हे ईश्वर परब्रह्मस्वरूप असतात. गुरूंना अनन्यभावे शरण जावे. काया, वाचा, मने त्यांची नित्य सेवा करावी. गुरूसेवा हीच ईश्वरसेवा होय. महर्षी नारद यांनी निवेदिलेल्या नारदीय नवविधा भक्तिनुसार श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आत्मानिवेदन केलेल्या श्रीगुरू भक्तीतून भक्ताचा आत्मोद्धार होतो. आत्मोन्नत झाल्याने जीवाला ईश्वरभेटीची ओढ लागते.

आजवर प्रपंचात रमलेल्या व त्यासाठी अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या जीवाला भोगलेले जीवनसुख व देहसुखाच्या आनंदापेक्षा जीवाचा आत्मानंद, शाश्वत आनंद मिळावा असे वाटू लागते. देहबुद्धीचे निरसन होऊन अशा मुमुक्षु भक्ताची आत्मबुद्धी श्रीगुरूकृपेने जागृत होते. शरीर म्हणजे 'मी नसून मी एक आत्मा आहे याची जाणीव होऊन 'मी' कोण, माझे सत्य स्वरूप कोणते व कसे आहे असे प्रश्न जीवाला पडतात. त्यातच संतांनी आजपर्यंत सांगितलेल्या संतवाणीतून 'मनुष्यजन्म दुर्लभ आहे. ८४ लक्ष जन्म योनीच्या फेऱ्यातून तो प्राप्त होतो. या मानवजन्माचे सार्थक करून स्वतःचे नीजस्वरूप 'आत्मा' यास जाणून घ्यावे व जीवाचे सार्थक, आत्मकल्याण करावे, या संतवचनाचा अर्थ श्रीगुरू कृपेने जीवास उमगतो.

संत परमानंद महाराज लिखित 'अवतारलीला आत्म स्वरूपाची (नित्य नियम साधना) अध्याय ३ रा आत्मरूप वर्णन आणि अध्याय ४ अष्टांग योग यातून सांगत आहेत

**ईश सकळांचा एक आत्मा।**
**इष्ट देवी-देवतांचा आत्मा।**
**सर्वांचिया हृदयस्थ ध्याता आत्मा।**
**आत्मा तोचि परमात्मा ।।१२।।**

(अध्याय तिसरा)

**सदगुरू कृपेविण आत्मा दुर्गम।**
**म्हणोनी करावे हे निवेदन।**
**अनन्य भावे जावोनी शरण।**
**हृदयी श्रीचरण पूजावे।।४१।।**

(अध्याय तिसरा)

**आत्मा असे हृदयांतरी।**
**आत्मा वसे चराचरी।**
**आत्मा दिसे सर्व देशी।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**सर्वात्मक सर्व व्यापक।।४९।।**

(अध्याय तिसरा)

**गुरू आज्ञे आत्मचिंतन करीता।**

**ओळख स्वरूपाची होतसे।**

**आत्मदर्शन घडवोनी आद्यगुरू।**

**स्वस्वरूपी पोहोचवतसे।।२१।।**

(अध्याय ४ अष्टांग योगदर्शन)

आत्मप्राप्तीसाठी ईश्वरावर, आपल्या श्रीगुरूवर नितांत श्रद्धा, भक्ती, प्रेम पाहिजे. आपले कर्माचरण हे सात्त्विक, निष्काम व ईश्वराला समर्पित असावे. विविध तीर्थाटने करताना तेथील तीर्थे देवस्थानातील देव-देवता यांसाठी मनात ईश्वरभक्ती असावी. प्रतिमा, मूर्तीपूजा यातही भक्तिभाव पाहिजे. ईश्वराची, श्रीगुरूची मानसपूजाही महत्त्वाची आहे. श्रीगुरूंची आपल्या हृदयी आत्मस्वरूपातील केलेली पूजा, आत्मपूजा ही सर्व देवांची पूजा होते.

संतांनी मानवाच्या आत्मकल्याणासाठी अखंडित विश्वात्मक कार्य केले आहे. त्यात श्री संत ज्ञानेश्वर माऊलींनी 'श्रीमद् भगवत गीतेचा' मराठी 'ज्ञानेश्वरी' अनुवाद, संत तुकाराम महाराजांचे ईश्वरभक्तीने ओतप्रत भरलेली अभंगगाथा आणि संत समर्थ रामदास स्वामींचे ईश्वराची अनुभूती देणारे मनोबोधाचा ग्रंथ मार्गदर्शन या सर्वांतून अखिल मानव जगत्कल्याणासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांचे अनंत उपकार या मानव समाजावर आहेत. ईश्वरनामाच्या भक्तीत त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी सुरू केलेली पंढरपूर येथील विठोबाची पायी वारी आज लाखोंच्या संख्येने वारकरी करतात.

संत हेच सांगतात 'आत्मा जाणावा अंतरी, पाहावा सर्वांठायी', सर्वांभूती ईश्वर पाहा. 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' अशी वृत्ती ठेवा.' या अखिल विश्वात्मक लोक कल्याणासाठी ईश्वराचे स्वरूप भक्ताला समजावे यासाठी प. पू. सद्गुरू आत्मा मालिक माऊली सांगतात, ईश्वर परमात्मा हा आत्मस्वरूपात सर्वांच्या हृदयी निवास करतो. स्वस्वरूप आत्म्याची ओळख होण्यासाठी कोणत्याही सगुण आकारात ध्यानाद्वारे आत्म्याचे आत्मचिंतन करावे. अभ्यासातून नित्य केलेल्या आत्मचिंतनातून श्रीगुरूकृपेने आत्मज्ञान होऊन आत्मप्राप्ती होईल. आत्मानुभूती येईल व जीवनात जीवाला शाश्वत सुख-समाधान प्राप्त होईल. आत्मा मालिक.

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र. ५, नव महाराष्ट्र को. ऑप. हौ. सोसायटी

सातारा रोड, अरण्येश्वर कॉर्नर,

पुणे - ४११००९.

मो. नं. - ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## विछोह

मनुष्य का पहला अनुभव ही विछोह है। जब शिशु माँ के गर्भ से बाहर आता है, वह रोता है। यह रोना केवल शारीरिक परिवर्तन का संकेत नहीं है; यह उस पहली दूरी की प्रतिक्रिया है, जहाँ वह पूर्ण एकता से अलग होकर एक स्वतंत्र अस्तित्व में प्रवेश करता है। गर्भ में वह संपूर्ण था-न कोई चाह, न कोई अभाव। लेकिन जन्म के साथ ही वह द्वैत में आ गया-मैं और दुनिया का भेद शुरू हो गया। उपनिषद कहते हैं-द्वैत से ही भय उत्पन्न होता है। यही द्वैत, यही अलगाव, आगे चलकर जीवन की पूरी यात्रा का आधार बनता है।

- नरेश यादव

विछोह यह एक ऐसा शब्द है जो एक क्षण से लेकर जन्म जन्मांतर के पश्चात् मुक्ति तक के अंतराल में मिलता है, किंतु परे होने के प्रतीक के रूप में जाना जाता है, तथा हर जगह नए मायने संजोता है. पर समय के साथ इसकी प्रासंगिकता भी हमेशा बनी रहेगी, सांसारिकता से लेकर संतो व महंतों तक इसे कई रूपों में- बेटी की बिदाई में, तो लड़कों के नये घर बसाई में, मित्रों के आपने अपने संसार में खो जाने, तो बच्चों का अपने जीवन उद्देश्य के लिए घर से निकल पड़ने, संत समागम के पश्चात् अपने अपने तपस्या स्थल की ओर निकल पड़ने, या कुंभ के पश्चात् अपने अपने गंतव्यों को प्रस्थान करने या जीवन से परे चले जाने अर्थात् मुक्ति सभी में इस शब्द की अपनी अलग महिमा है, आओ हम इसे विस्तार देकर इसका महत्व कुछ प्रासंगिक कहानियों के साथ समझें और जीवन में जब भी इस प्रक्रिया के निकट हों- उसे एक वार यादगार रूप में कैसे सजाएँ इसकों समझते हैं

विछोह-बिछड़ना नहीं, स्वयं से मिलने की यात्रा यह शब्द जितना छोटा है, उतना ही गहरा। इसे हम अक्सर एक पीड़ा, एक कमी, एक टूटन के रूप में देखते हैं। जब कोई अपना हमसे दूर होता है, जब परिस्थितियाँ हमें अलग कर देती हैं, या जब समय अपने प्रवाह में संबंधों को पीछे छोड़ देता है-तब हम कहते हैं, विछोह हो गया। परंतु क्या सच में विछोह केवल बिछड़ना है? या यह कुछ और भी है-कुछ ऐसा, जो हमारी समझ से परे होकर भी हमारे जीवन का सबसे महत्वपूर्ण शिक्षक बनता है?

यदि हम जीवन को ध्यान से देखें, तो पाएंगे कि विछोह कोई आकस्मिक घटना नहीं, बल्कि अस्तित्व का नियम है। जन्म से लेकर मृत्यु तक, हर मोड़ पर यह हमारे साथ चलता है-कभी कोमल स्पर्श की तरह, कभी गहरी चोट की तरह, और कभी एक मौन मार्गदर्शक की तरह।

मनुष्य का पहला अनुभव ही विछोह है। जब शिशु माँ के गर्भ से बाहर आता है, वह रोता है। यह रोना केवल शारीरिक परिवर्तन का संकेत नहीं है; यह उस पहली दूरी की प्रतिक्रिया है, जहाँ वह पूर्ण एकता से अलग होकर एक स्वतंत्र अस्तित्व में प्रवेश करता है। गर्भ में वह संपूर्ण था-न कोई चाह, न कोई अभाव। लेकिन जन्म के साथ ही वह द्वैत में आ गया-मैं और दुनिया का भेद शुरू हो गया।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

उपनिषद कहते हैं-द्वैत से ही भय उत्पन्न होता है। यही द्वैत, यही अलगाव, आगे चलकर जीवन की पूरी यात्रा का आधार बनता है।

ओशो इस क्षण को एक सुंदर दृष्टि से देखते हैं। वे कहते हैं-हर जन्म एक विछोह है, और हर विछोह तुम्हें पुनः उस एकता की खोज में ले जाता है। अर्थात्, जो अलगाव हमें पीड़ा देता है, वही हमें उस परम मिलन की ओर भी प्रेरित करता है।

बचपन में यह विछोह छोटे-छोटे रूपों में प्रकट होता है। माँ की उंगली छोड़कर पहला कदम उठाना, पहली बार स्कूल जाना, पहली बार बिना सहारे खड़े होना-ये सभी छोटे विछोह हैं, जो हमें स्वतंत्रता की ओर ले जाते हैं। उस समय हमें डर लगता है, लेकिन वही डर धीरे-धीरे आत्मविश्वास में बदल जाता है। गीता में श्रीकृष्ण कहते हैं-उद्धरेदात्मनाऽत्मानं-मनुष्य को स्वयं ही स्वयं को उठाना होगा। यह उठना तभी संभव है, जब वह दूसरों पर निर्भरता से अलग हो।

जैसे-जैसे हम बड़े होते हैं, विछोह का स्वरूप भी बदलता जाता है। किशोरावस्था में यह मानसिक और भावनात्मक स्तर पर उभरता है। हम अपने माता-पिता की सोच से अलग होने लगते हैं, अपने निर्णय लेने लगते हैं, अपनी पहचान खोजने लगते हैं। यह समय संघर्ष का होता है-बाहरी भी और आंतरिक भी। लेकिन यही संघर्ष हमें एक स्वतंत्र व्यक्तित्व बनाता है। बुद्ध का वचन-अप्प दीपो भव-स्वयं अपना दीपक बनो-तभी सार्थक होता है, जब हम दूसरों की छाया से बाहर निकलते हैं।

फिर जीवन में प्रेम आता है। और प्रेम के साथ एक नया प्रकार का विछोह जन्म लेता है। हम जिसे प्रेम कहते हैं, उसमें अक्सर मिलन की आकांक्षा होती है-हम चाहते हैं कि दूसरा व्यक्ति हमारा हो जाए, हमारे साथ रहे, कभी दूर न जाए। लेकिन यहीं से विछोह की संभावना भी शुरू होती है। क्योंकि जहाँ स्वामित्व है, वहाँ भय है-खो देने का भय। कबीर कहते हैं-जहाँ प्रेम वहाँ नहीं मैं, जहाँ मैं वहाँ प्रेम नहीं। यदि प्रेम में मैं है, तो वह प्रेम नहीं, आसक्ति है। और आसक्ति का अंत हमेशा विछोह की पीड़ा में होता है। ओशो प्रेम को एक अलग दृष्टि से देखते हैं। वे कहते हैं-प्रेम दो स्वतंत्र व्यक्तियों का उत्सव है, न कि दो कैदियों का समझौता। यदि हम इस बात को समझ लें, तो विछोह एक त्रासदी नहीं रहेगा। वह एक स्वाभाविक प्रक्रिया बन जाएगा-जैसे नदी का बहना, जैसे ऋतुओं का बदलना।

विवाह और परिवार के संदर्भ में विछोह और भी गहरा हो जाता है। विशेषकर भारतीय संस्कृति में बेटी की विदाई-यह एक ऐसा क्षण है, जहाँ विछोह अपनी चरम संवेदनशीलता में प्रकट होता है। एक घर, जहाँ उसने अपना बचपन बिताया, जहाँ हर कोना उसकी यादों से भरा है-उसे छोड़कर वह एक नई दुनिया में प्रवेश करती है। यह केवल स्थान परिवर्तन नहीं है, यह एक पहचान का रूपांतरण है। माता-पिता के लिए यह क्षण गर्व और पीड़ा का संगम होता है।

गीता में कहा गया है-वासांसि जीर्णानि यथा विहाय-जैसे मनुष्य पुराने वस्त्र त्यागकर नए धारण करता है, वैसे ही आत्मा भी नए रूप लेती है। यह श्लोक केवल मृत्यु पर ही लागू नहीं होता, बल्कि जीवन के हर परिवर्तन पर लागू होता है। बेटी की विदाई भी एक प्रकार का पुराना छोड़कर नया अपनाना है।

इसी प्रकार, जब पुत्र अपने घर से दूर जाकर अपने जीवन की जिम्मेदारियाँ संभालता है, तो वह भी एक

मौन विछोह होता है। उसमें आँसू कम दिखते हैं, लेकिन भीतर का परिवर्तन उतना ही गहरा होता है।

मित्रता भी विछोह की इस यात्रा से अछूती नहीं रहती। बचपन के मित्र, कॉलेज के साथी-जो कभी जीवन का अभिन्न हिस्सा होते हैं-समय के साथ धीरे-धीरे दूर हो जाते हैं। कोई अपने करियर में व्यस्त हो जाता है, कोई अपने परिवार में, कोई अपने सपनों में खो जाता है। कबीर कहते हैं-चलती चाकी देख के, दिया कबीरा रोय-इस जीवन की चक्की में सब कुछ बदलता रहता है, कुछ भी स्थायी नहीं। यह समझ जब गहराई से उतरती है, तब विछोह हमें तोड़ता नहीं, बल्कि हमें यथार्थ के करीब लाता है।

जीवन का एक और महत्वपूर्ण विछोह तब होता है, जब व्यक्ति अपने उद्देश्य की ओर बढ़ता है। जब वह घर छोड़कर, अपनी सुविधा छोड़कर, अपने सपनों के पीछे निकल पड़ता है। यह विछोह उसे अकेला करता है, लेकिन यही अकेलापन उसे भीतर से मजबूत बनाता है। बुद्ध ने जब राजमहल छोड़ा, तो वह केवल एक स्थान का त्याग नहीं था-वह एक पूरी जीवनशैली का विछोह था। उसी विछोह ने उन्हें बुद्ध बनाया।

और फिर आता है सबसे गहरा विछोह-आध्यात्मिक विछोह। यह बाहरी नहीं, आंतरिक होता है। यहाँ व्यक्ति को अपने अहंकार, अपनी पहचान, अपने मैं को छोड़ना पड़ता है। उपनिषद का वचन-नेति नेति-यह नहीं, यह नहीं-हमें इसी दिशा में ले जाता है। जब तक हम हर उस चीज़ को नहीं छोड़ते, जिससे हम अपनी पहचान जोड़ते हैं, तब तक हम अपने वास्तविक स्वरूप को नहीं जान सकते।
ओशो कहते हैं-तुम्हारा सबसे बड़ा बंधन तुम्हारा 'मैं' है। जब यह 'मैं' टूटता है, तब विछोह समाप्त हो जाता है-क्योंकि अब कोई अलगाव बचता ही नहीं।

संतों और महात्माओं का जीवन इसी सत्य का उदाहरण है। कबीर, बुद्ध, महावीर-इन सभी ने विछोह को अपनाया, उससे भागे नहीं। उन्होंने संसार को नहीं छोड़ा, बल्कि आसक्ति को छोड़ा। यही कारण है कि उनका विछोह दुख नहीं, जागरण बन गया, फिर हमेशा ही परमानंद।

मृत्यु को हम विछोह का अंतिम रूप मानते हैं। जब कोई अपना इस संसार से चला जाता है, तो हमें लगता है कि सब कुछ समाप्त हो गया। लेकिन गीता हमें एक अलग दृष्टि देती है-न जायते म्रियते वा कदाचित्-आत्मा न जन्म लेती है, न मरती है। यदि आत्मा शाश्वत है, तो विछोह किसका है? यह केवल शरीर का है, केवल रूप का है। सत्य तो बना रहता है।

और अंततः, मुक्ति-यह विछोह का परम रूप है। यहाँ आत्मा सभी बंधनों से मुक्त होकर परम में विलीन हो जाती है। यह विछोह नहीं, यह अंतिम मिलन है-जहाँ कोई दूरी नहीं, कोई द्वैत नहीं।
जब हम इस पूरी यात्रा को देखते हैं, तो समझ में आता है कि विछोह जीवन का अभिशाप नहीं, बल्कि उसका सार है। यह हमें सिखाता है-छोड़ना, स्वीकार करना, और अंततः स्वयं को जानना।

और शायद इसी समझ को एक गुरु ने अपने शिष्य को एक दिन बहुत सरल, लेकिन गहरे शब्दों में समझाया।

एक शिष्य, जिसकी आँखों में पीड़ा थी, अपने गुरु के पास आया और बोला-
गुरुदेव, मैं हर बार टूट जाता हूँ। जिसे भी मैं प्रेम करता हूँ, वह मुझसे दूर हो जाता है। यह विछोह मुझे भीतर से खाली कर देता है।

गुरु ने शांत दृष्टि से उसकी ओर देखा और पूछा-

तुम किसे पकड़ना चाहते हो?

शिष्य ने कहा-

अपने लोगों को, अपने संबंधों को, अपनी यादों को

गुरु मुस्कुराए-

और क्या तुमने कभी सोचा, कि तुम खुद कौन हो, जो पकड़ना चाहता है?

शिष्य मौन हो गया।

गुरु ने आकाश की ओर इशारा किया-

उस पक्षी को देखो। वह आता है, बैठता है, फिर उड़ जाता है। क्या आकाश उसे रोकता है?

नहीं, शिष्य ने धीरे से कहा।

फिर भी, गुरु बोले, पक्षी हर बार आकाश में ही लौटता है। आकाश उसे बाँधता नहीं, फिर भी वह उससे अलग नहीं होता।

शिष्य की आँखें गहरी हो गईं।

गुरु ने कहा-

तुम पक्षी बनकर जी रहे हो-हर जगह टिकना चाहते हो। आकाश बनो-जहाँ सब आता है, जाता है, लेकिन तुम अपरिवर्तित रहते हो।

शिष्य ने काँपते स्वर में पूछा-

क्या तब विछोह समाप्त हो जाएगा?

गुरु ने उत्तर दिया-

जब तुम स्वयं को जान लोगे, तब कोई बिछड़ेगा ही नहीं। क्योंकि तब तुम पाओगे-सब तुममें ही है, और तुम सबमें।

कुछ क्षणों का मौन था। फिर शिष्य के आँसू बहने लगे-पर इस बार वे पीड़ा के नहीं, समझ के थे।

और गुरु ने अंतिम वाक्य कहा-

विछोह केवल वहाँ है, जहाँ 'मैं' है।

जहाँ 'मैं' मिट गया-वहाँ केवल मिलन है।

विछोह अब केवल एक शब्द नहीं रह जाता। वह एक द्वार बन जाता है,-जहाँ से गुजरकर मनुष्य स्वयं तक पहुँचता है,और इस द्वार व मार्ग को ध्यान द्वारा पाया जा सकता है  वहाँ केवल मिलन है, वहाँ विछोह भी उत्सव में बदल जाता है । आत्मा मालिक

**- नरेश यादव,**

आत्मा मालिक परिवार, इंदौर

***




*** प्रेषक ***

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१